Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 ● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://epaper.marathwadapatra.com ● https://marathwadapatra.com




दैनिक

। बीड । छत्रपती संभाजीनगर । जालना । लातूर । परभणी । धाराशिव । हिंगोली । नांदेड । नगर

# मराठवाडा पत्र

Mo. 9822152955

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




Beed | DAILY | MARATHI | Year-03 | Issue -301 | FRIDAY DT.02 FEBRUARY 2024 | RNI-MAHMAR/2021/80074 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

बीड | दैनिक | मराठी | वर्ष -०३ | अंक -३०१ | शुक्रवार,दि.०२ फेब्रुवारी २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२१/८००७४ | । किंमत ३ रू | । पाने ४

# संभाजीनगरात गॅस गळतीची इमर्जन्सी

## १४ तासानंतर सिडको उड्डाणपूल वाहतूकीसाठी झाला खुला; शाळा, दुकाने करावी लागली होती बंद

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर येथील सिडको बसस्थानक भागात टँकरमधून गॅस गळती होत असल्यामुळे आणीबाणी उद्भवली आहे. पहाटे ६ पासून ही गॅसगळती सुरू आहे. यामुळे या भागातील शाळा, वाहतूक, दुकाने, हॉटेल्स व अन्य प्रतिष्ठाने पूर्णतः बंद ठेवण्यात आली होती. तब्बल १४ तासानंतर अखेर वाहतूक सुरळीत करण्यात आली.

खबरदारी म्हणून या भागातील नागरिकांना विजेची उपकरणे बंद ठेवण्याचेही आवाहन करण्यात आले आहे. या घटनेमुळे शहराची जिवनवाहिनी असणारा जालना रोड पूर्णतः बंद करण्यात आला होता. यामुळे या मार्गावरील वाहतूक पर्यायी मार्गाने वळवण्यात आली आहे. पाहा या घटनेशी संबंधित काही निवडक फोटो...

सातत्याने टँकरवर पाणी मारणे सुरू आहे. जळगावची एमर्जन्सी रेस्क्यू टीम दाखल झाली असून गॅस लिकेज थांबवण्याचा प्रयत्न केला जात आहे. गॅस लिकेज होत आहे परंतु टँकरमध्ये गॅस पूर्णपणे भरलेला दिसत आहे.यावर उपाय म्हणून हा गॅस दुसऱ्या टँकरमध्ये





### जालना रोडवरील वाहतूक वळवल्याने शुकशुकाट

भरण्याची व्यवस्थाही करण्यात आली आहे.जर अशाच प्रकारे प्रोसेस सुरू राहिली तर जवळपास तीस तास लागण्याची शक्यता आयुक्तांनी वर्तवली आहे.तसेच, सिडको परिसरातील नागरिकांना घरातील गॅस न पेटवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### अधिकृत बॅनर लावण्यासाठी टेंडर प्रक्रिया झालीच नाही तर मग

## बॅनर हटवण्यात नगरपालिके कडुन दुजाभाव का ?? :- डॉ.गणेश ढवळे



बीड शहरात अधिकृत बॅनर लावण्यासाठी टेंडर प्रक्रिया झालेली नाही .येत्या आठ दिवसात टेंडर प्रक्रिया पूर्ण केली जाईल .त्यानंतर शहरात अधिकृत बॅनर लावण्याचे ठिकाण निश्चित केले जाईल. शहरात बॅनर लावण्यासाठी एकाही व्यक्तीने परवानगी घेतली नाही असे कर अधीक्षक बीड नगरपालिका व्ही.बी.तिडके यांनी स्पष्ट केलेले असताना आणि शहरातील सर्वच बॅनर हे अनाधिकृत आहेत.

(उर्वरीत पान २ वर)

### साबळे हॉस्पिटल माजलगाव येथे शासन मान्य



## गर्भपात केंद्र व कुटुब नियोजन शत्रकिया सेवा पुन्हा सुरू

माजलगाव। प्रतिनिधी

येथिल साबळे हॉस्पिटल येथे शासन मान्य गर्भपात केंद्र व कुटुब नियोजन शत्रकिया सेवा पुन्हा सुरू झाली आहे. शासकीय

आरोग्य यंत्रणेवरील कामाचा भार कमी करण्यासाठी व माजलगाव परिसरातील लोकाचे सेवे साठी साबळे हॉस्पिटल माजलगाव येथे शासन मान्य गर्भपात केंद्र व कुटुब नियोजन शत्रकिया सेवा पुन्हा सुरू केली आहे. शिव छत्रपती जयंती निमित्त दी:१८/०२/२०२४ रोजी मोफत कुटुब नियोजन शत्रकिया शिबिर आयोजित केलेले

(उर्वरीत पान २ वर)



बीड। प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते आमदार रोहित पवार यांच्या ईडीमार्फत होणाऱ्या चौकशीच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी बीड येथे थेट रस्त्यावर उतरुन निषेध केला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या मांडून या चौकशी प्रकरण सरकारविरोधात कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली.उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा एक गट फुटून सरकारमध्ये सामील झाला असला तरी राष्ट्रवादी काँग्रेसचे असंख्य कार्यकर्ते आणि पदाधिकारी हे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यासोबत लढत आहेत .

# केवळ वीस हजारांसाठी वकील दांपत्याचा घेतला बळी

नगर : सिन्नर (जि. नाशिक) येथील न्यायालयातील वॉरंट तोडण्यासाठी ऍड. आढाव यांना वीस हजार दिले. परंतु, आढाव यांनी काम केले नाही. त्यामुळे आढाव यांच्याकडून पैसे उकळण्याचा प्लॅन करून आरोपी किरण दुशिंग व त्याच्या साथीदारांनी वकील दाम्पत्याचे अपहरण करून खून केल्याचे तपासात समोर आले आहे. त्यात संगमनेर जेलमध्ये एकाच बराकीत राहिलेल्या त्या मित्राचा फोन नंबर पोलिसांना आरोपीपर्यंत घेऊन गेला, असे पोलिस तपासात निष्पन्न झाले. ऍड. राजाराम आढाव व त्यांची पत्नी मनीषा आढाव यांचा खून करून त्यांचे मृतदेह उंबरे येथील स्मशानभूमीजवळील विहिरीत टाकले. याप्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे. किरण ऊर्फ दत्तात्रेय नानाभाऊ दुशिंग (रा. उंबरे, ता. नगर), भैया ऊर्फ सागर साहेबराव खांदे (रा. येवले आखाडा, ता. राहुरी), शुभम संजित महाडिक (रा. गणपतीवाडी शाळेजवळ मानोरी, ता. राहुरी), हर्षल दत्तात्रय ढोकणे (वय २०, रा. उंबरे, ता. राहुरी, नगर) अशी आरोपींची नावे आहेत. पोलिस तपासात मिळालेली माहिती अशी, आरोपी किरण दुशिंग याच्यावर वावी (ता. सिन्नर) पोलिस ठाण्यात दरोड्याचा गुन्हा दाखल होता. त्यात गुन्ह्यातील वॉरंट तोडण्यासाठी किरणने ऍड. राजाराम आढाव यांना वीस हजार रुपये दिले होते.



मात्र, त्यानंतरही दुशिंगविरुद्धचे वॉरंट तसेच राहिले. तो सल किरण दुशिंगच्या मनात होता. त्याने वरील साथीदारांना बरोबर घेत ऍड. आढाव यांच्याकडून पाच ते दहा लाख उकळण्याचा प्लॅन केला. त्यासाठी शुभम महाडिक याने मोठा वाटा उचलला. कारण शुभम आणि आढाव एकाच गावचे असून, शुभमचे वकिलांच्या घरी येणे-जाणे होते. प्लॅननुसार, शुभमने ऍड. आढाव यांना फोन करून सांगितले, की पाथर्डी न्यायालयात एका मित्राचा जामीन करायचा आहे, त्याचे दहा हजार रुपये माझ्याकडे आले आहेत. पाथर्डीला जाण्याचा विषय असल्याने आढाव तयार झाले. त्यानंतर शुभम त्यांना आणण्यासाठी कोर्टात गेला. हे सर्व जण ऍड. आढाव यांना घेऊन पाथर्डीकडे निघाले; मात्र त्यांनी आढाव यांना ब्राह्मणी शिवारात नेले. तेथे

(उर्वरीत पान २ वर)




## उस वाहतुक करणा-या टायरबैलगाडीस पिकअपची जोरदार धडक

बीड । प्रतिनिधी

जय महेश कारखान्याला टायर गाडीने उस पुरवठा करणारे गंगामसला येथील ज्ञानोबा कुंडलिक धरपडे यांच्या टायर गाडीला राष्ट्रीय महामार्गावरील खरात आडगाव पाटीजवळ भरधाव अशोक लिलँड पिकअपने दिलेल्या धडकेत टायर गाडीचा एक बैल जागीच ठार तर एक बैल गंभिर जखमी झाल्याची घटना दि. ३१ जानेवारी रोजी रात्री १०.०० च्या सुमारास घडली असुन याप्रकरणी ग्रामीण पोलिसात आपघाताचा गुन्हा दाखल झाला आहे.



याबाबत पोलिस सुत्रांकडुन मिळालेली माहिती अशी की, गंगामसला येथील ज्ञानोबा कुंडलिक धरपडे हे जय महेश कारखान्यास टायरच्या बैलगाडीने उसपुरवठा करतात. त्यांनी गंगासमला शिवारातील अविनाश सोळंके यांच्या शेतातील उस तोडणी करून तो उस बैलगाडीत भरून कारखान्याला गाळपास घेवुन जात होते परंतु राष्ट्रीय महामार्गावर गंगामसला ते माजलगाव दरम्यान असलेल्या खरात आडगाव पाटीजवळ भरधाव अशोक लिलँड कंपनीचा पिकअप क्रं. एम.एच. २६ एडी ८७५८ ने दिलेल्या जोरदार धडकेत टायर गाडीचा एक बैल जागीच ठार तर एक बैल गंभिर जखमी झाल्याची घडना घडली आहे. याप्रकरणी ज्ञानोबा धरपडे यांच्या फिर्यादीवरून ग्रामीण पोलिसात गु. र. नं. २२/२०२४ कलम २७९, ४२९, ४२७ प्रमाणे गुन्हा दाखल झाला असुन पिकअप पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.






संपादकीय

## कोणाला काय मिळाले?

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी गुरुवारी २०२४-२५ चा अंतरिम बजेट संसदेत सादर केला. त्यात महिला, शेतकरी, नोकरदार आणि व्यापार्यांसाठी अनेक महत्त्वाच्या घोषणा करण्यात आल्या. त्यात विद्यार्थी, कामगार, संरक्षण क्षेत्रासाठी अनेक योजना आहेत. परंतु सर्वसामान्यांसाठी काय दिले हे सविस्तर जाणून घेऊ.

करात बदल नाही, एक कोटी कुटुंबांना ३०० युनिटपर्यंत मोफत वीजहे मोदी सरकारचं दुसरं अंतरिम बजेट आहे. यावेळी अर्थमंत्र्यांनी भाषण कमी केले परंतु अनेक छोट्या मोठ्या घोषणा त्यांनी केल्या. त्यात काही महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय घेण्यात आले.

यावेळच्या बजेटमध्ये काहीही स्वस्त किंवा महाग झालेले नाही. असे का? कारण २०१७ मध्ये जीएसटी लागू झाल्यानंतर, अर्थसंकल्पात केवळ कस्टम ड्युटी आणि एक्साइज ड्यूटी वाढवली किंवा कमी केली गेली, ज्याचा परिणाम फक्त काही गोष्टींवर होतो. त्यामुळे यावेळी सरकारने कस्टम ड्युटी किंवा एक्साईज ड्युटीमध्ये कोणताही बदल केलेला नाही.

नोकरदार वर्गाला काय मिळालं? - सरकारने अंतरिम अर्थसंकल्पात सर्वसामान्यांना इन्कम टॅक्समध्ये कोणताही दिलासा दिलेला नाही. तुम्ही जुनी कर व्यवस्था निवडल्यास, तुमचे २.५ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न अजूनही करमुक्त राहील. तथापि, आयकर कायद्याच्या कलम ८७- अंतर्गत, तुम्ही ५ लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर कर वाचवू शकता.

शेतकर्यांना काय मिळाले? - लोकसभा निवडणुकीपूर्वी मोदी सरकारने अंतरिम अर्थसंकल्पात शेतकर्यांसाठी कोणतीही विशेष घोषणा केलेली नाही. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितले की, पिकांवर नॅनो ऊ.-.झ. वापरले जाईल. याशिवाय दुग्धविकास क्षेत्रात चांगले काम करून दूध उत्पादकांना प्रोत्साहन दिले जाईल. सरकारने किमान आधारभूत किमतीची (चडझ) व्याप्तीही वाढवली नाही.

महिलांना काय मिळाले? अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितले की, सर्व आशा वर्कर्स आणि अंगणवाडी सेविकांना आयुष्मान भारत योजनेच्या कक्षेत आणले जाईल. लखपती दीदी योजनेंतर्गत ३ कोटी लखपती दीदी तयार करण्यात येणार आहेत. येत्या ५ वर्षांत २ कोटी घरे बांधली जातील. गृहनिर्माण योजनेंतर्गत ७०% घरे महिलांच्या नावावर आहेत.

विद्यार्थ्यांना काय मिळाले? अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्पीय भाषणात सांगितले की, हा अंतरिम अर्थसंकल्प ४ वर्गाला केंद्रित आहे. गरीब, महिला, तरुण आणि शेतकरी. शिक्षण आणि रोजगार क्षेत्रासाठी रुग्णालये वैद्यकीय महाविद्यालयांशी जोडण्यासाठी समिती स्थापन करण्यात येईल. १ लाख कोटी रुपयांचा निधी तयार केला जाईल. हे कॉर्पस ५० वर्षांसाठी बिनव्याजी कर्ज प्रदान करेल

विकासकामांना काय मिळाले? अंतरिम अर्थसंकल्पात पायाभूत सुविधा क्षेत्रासाठी मोठी घोषणा करण्यात आली. माल वाहतुकीसाठी बांधल्या जाणार्या रेल्वे कॉरिडॉरशिवाय एनर्जी आणि सिमेंट कॉरिडॉर, पोर्ट कनेक्टिव्हिटी कॉरिडॉर आणि हाय डेन्सिटी कॉरिडॉर बांधण्याची घोषणाही करण्यात आली. याशिवाय वंदे भारत मानकाचे रेल्वेचे ४० हजार डबे बनवण्याची घोषणा करण्यात आली.

संरक्षण क्षेत्राला काय मिळाले? केंद्र सरकारने अंतरिम अर्थसंकल्पात संरक्षणावरील खर्चासाठी ६.२ लाख कोटी रुपये दिले आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत यात केवळ ०.२७ लाख कोटी रुपयांची वाढ झाली आहे. सरकारने गेल्या वर्षी संरक्षण बजेटसाठी ५.९३ लाख कोटी रुपये दिले होते. २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या एकूण अर्थसंकल्पाच्या ८% संरक्षणावर खर्च केला जात आहे.

अंतरिम अर्थसंकल्पाबाबत भाजप नेत्यांनी पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाचे कौतुक केले. अंतरिम अर्थसंकल्पातून चांगले संकेत मिळाले असल्याचे संरक्षणमंत्र्यांनी सांगितले. त्याचवेळी विरोधक अर्थसंकल्पावर नाराज असल्याचे दिसून येत आहे. काँग्रेस नेते शशी थरूर म्हणाले की, अर्थसंकल्प केवळ मोठमोठ्या शब्दांत तयार करण्यात आला असून त्यातून ठोस काहीही निष्पन्न झाले नाही.

**जाहीर प्रगटन**

**मा. श्रीमती डी के पाटील ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश, क, स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १४०/२०२४ निकीता व इतर विरुध्द निरंक**

**ॲड. टी बी भालेराव**

संतोष वि.निरंक

**अर्जदार :- १) निकीता पि. दिलीप आवचर वय २४ वर्षे, धंदा रा. वडवाडी बोरखेड ता. जि. बीड. शिक्षण,**

**२) अनिकेत पि. दिलीप आवचर, वय २० वर्षे, धंदा शिक्षण, रा. वडवाडी बोरखेड ता. जि. बीड.**

**विरुध्द**

**निरंक**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत नामे मिना प्र. दिलीप आवचर यांचे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत नामे मिना भ्र. दिलीप आवचर रा. वडवाडी बोरखेड ता. जि. बीड यांचा मृत्यु दिनांक ०२/०१/२०२४ रोजी बोरखडे ता. जि. बीड येथे झाला. अर्जदार क. ०१ ही मयताची मुलगी असून अर्जदार क. ०२ हा मयताचा मुलगा आहे मयताचे पती यापुर्वीच मयत झालेले आहेत अर्जदार क. ०१ व ०२ हे मयताचे वारस आहेत व मयतास सदर अर्जदाराशिवाय इतर कुणीही वारस नाही.

वरील अर्जदारांना मयताचे मृत्युनंतर शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे असे अर्जदार क. ०१ व ०२ यांनी अर्जात नमूद केलेले आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांवा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत मिना प्र. दिलीप आवचर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक २३/०१/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आज **दि.२३/०१/२०२४** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -०२/०३/२०२४**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,बीड

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड

# लोकशाही जीवंत ठेवण्याची जबाबदारी आता खऱ्या अर्थाने पत्रकारांवरच : राही भिडे

## माजलगावात मूकनायक आणि माजलगाव भूषण सन्मान सोहळा रंगला

माजलगाव (प्रतिनिधी) सध्याचे राजकीय वातावरण पाहता लोकशाही जीवंत ठेवण्याची जबाबदारी खऱ्या अर्थाने पत्रकारांवरच आली आहे,असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार, राजकीय विश्लेषक राही भिडे यांनी केले. त्या माजलगाव येथे गुरूवार दि १८ जानेवारी रोजी मूकनायक आणि माजलगाव भूषण सन्मान सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या. माजलगाव एकता पत्रकार संघाच्यावतीने मूकनायक आणि माजलगाव भूषण सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीडचे आमदार संदीप क्षीरसागर,प्रमुख अतिथी म्हणून जेष्ठ पत्रकार,राजकीय विश्लेषक राहीताई भिडे,महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे,माजी आमदार सय्यद सलीम,माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील,माजी आमदार मोहनराव सोळंके,आ.प्रकाश सोंळके,राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस रविकांत राठोड, भाजपा नेते रमेश आडसकर,लोकपत्रकार भागवत तावरे आदींनी उपस्थिती होती. प्रारंभी प्रास्ताविक माजलगाव एकता पत्रकार संघाचे पत्रकार वाजेद पठाण यांनी केले. पुढे बोलताना राही भिडे म्हणाल्या, सध्याची राजकीय परिस्थिती विदारक असून लोकशाही धोक्यात आलेली असताना ती वाचवण्यासाठी आता पत्रकारांवर खरी जबाबदारी आली आहे.

अध्यक्षीय भाषणात आमदार संदीप क्षीरसागर म्हणाले, पत्रकारिता हा व्यवसाय नसून ते व्रत आहे.पत्रकारच समाजाचा खरा आरसा आहे. लोकप्रबोधना बरोबरच राजकरण्यांना योग्य दिशा देण्याचे कामही पत्रकार करत असतात. माजलगाव शहरातील वैष्णवी मंगल कार्यालयात दि १८ जानेवारी गुरुवार रोजी हा मुकनायक व माजलगाव भूषण सन्मान सोहळा थाटात रंगला. मान्यवरांच्या हस्ते मूकनायक सन्मान आरोग्यदूतचे संपादक बाबा श्रीहरी देशमाने,दै. मराठवाडा पत्रचे संपादक दत्तात्रय नरनाळे यांना प्रदान करण्यात आला. आहे.तसेच सन्मान भुमीपुत्रांचा यामध्ये अहमदनगर येथील महानगरपालिकाचे आयुक्त डॉ विजयकुमार जावळे, यवतमाळ जिल्ह्यातील नेर तालुक्याचे तहसीलदार डॉ.शिवाजी मगर व सां.बा.उपविभाग परळी येथील साहाय्यक अभियंता श्रेणी -२ दीपाली रामदास गिते तर माजलगाव भूषण पुरस्कार कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती नितीनराव नाईकनवरे, ड. भानुदास डक, रविंद्र कानडे,रामराजे रांजवण,डॉ.गणेश आगे,सरपंच




सौ. सिमाताई भालचंद्र सोळंके,इम्रान ताहेर सलीम खान, तलाठी सुर्यकांत गवई,ग्रामसेवक महेश गेंदले यांना प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन राहुल गिरी यांनी केले.तर आभार प्रदर्शन माजलगाव एकता पत्रकार संघाचे पत्रकार ज्योतीराम पांढरपोटे यांनी मानले.हा कार्यक्रम यशस्वीतेसाठी माजलगाव एकता पत्रकार संघाच्या वतीने अमर साळवे,राजेभाऊ पाष्टे,बालासाहेब उफाडे,नय्युम आत्तार,वसंत परसे, यांनी परिश्रम घेतले.

**पत्रकारांनी वंचितांचा आवाज बनावे : वसंत मुंडे**

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे म्हणाले, पत्रकारांनी वंचितांचा आवाज बनावे. सामान्य माणसांची प्रश्न समजून घेत त्यावर पत्रकारांनी आवाज उठवण्याची खरी गरज आहे. माजलगाव एकता पत्रकार संघाच्यावतीने दरवर्षी पत्रकारीता क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या पत्रकारासह माजलगाव तालुक्यातील सामाजिक कार्यात,आरोग्यरुग्ण सेवेमध्ये,उद्योजक, सहकारासह इतर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या बीड जिल्हा आणि माजलगाव तालुक्याच्या मातीतील व्यक्तीस मुकनायक व माजलगाव भूषण पुरस्कार देऊन गेल्या चार वर्षापासून सन्मानीत करण्यात येते.

# सांसकृतिक कलांचा वारसा पुढील पीढीमध्ये संप्रेषित व्हावा

## वार्षिक विद्यार्थी स्नेहसंमेलनाचा उदात्त हेतु आहे- आदिनाथ कुंडकर

**माजलगाव। प्रतिनिधी**

येथील श्री सिध्देश्वर माध्यमिक विद्यालयात दि.१ फेब्रुवारी रोजी इयत्ता ८वी ते १०वी विद्यार्थ्यांचा स्नेहसंमेलना निमित्त मोठ्या उत्साहात महाराष्ट्राची लोकधारा स्पर्धा संपन्न झाली. सर्वप्रथम नटांचे राजे नटराज शिवशंकर, विद्येची देवता सरस्वती, व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी




माध्यमिक विभाग शालेय समिति अध्यक्ष प्रशांत भानप मुख्याध्यापक अनंतराम कोपले, उपमुख्याध्यापक विठ्ठल काळे, पर्यवेक्षक रवींद्र खोडवे, सदाशिव ढगे, अभ्यासपूरक मंडळ प्रमुख श्रीमती अपर्णा मुळे, स्नेहसंमेलन प्रमुख आदिनाथ शास्त्री कुंडकर सह संमेलन प्रमुख शिवशंकर भंडारे, इत्यादि मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविकात स्नेहसंमेलन प्रमुख आदिनाथ शास्त्री कुंडकर म्हणाले की, वासुदेव, गोंधळ, जोगवा, भारूड, भक्तिगीत, भावगीत, भजन, इत्यादि सांसकृतिक कलांचा वारसा पुढील पीढीमध्ये संप्रेषित व्हावा. यांची विद्यार्थ्यांकडून उपासना व्हावी, हा या वार्षिक विद्यार्थी स्नेहसंमेलनाचा उदात्त हेतु आहे. चित्रपदृष्टितील मकरंद अनासपुरे, संदीप पाठक हे याच सिध्देश्वर संकुलात घडले यांचा संस्थेला सार्थ अभिमान आहे. भविष्यात असे कलावंत विद्यार्थी घडावेत या साठी हे स्नेहसंमेलन बालासाहेब झोडगे, कृष्णा नवले, गणेश विभूते या मान्यवरांनी परीक्षण केले. या रंगतदार कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती सुनंदा खांडेकर यांनी

केले. उत्तम प्रशासक मुख्याध्यापक अनंतराम कोपले यांच्या कुशल

मार्गदर्शनाने व क्रीडा शिक्षक पंडीत मेंडके यांच्या उत्कृष्ट सुनियोजनाने, तंत्रस्नेही शिक्षक चेतन धुरंधरे, नितीन सोनवने, व स्पर्धा प्रमुख आहेर सर तथा सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांच्या सहकार्याने ही स्पर्धा यशस्वी झाली. ८वी ई प्रथम ८वी ड द्वितीय क्रमांकाने विजयी झाला. इयत्ता ९ वी (क- प्रथम) ९वी (ह-द्वितीय) क्रमांकाने विजयी झाला. इयत्ता १०वी (क- प्रथम) १० (अ द्वितीय) क्रमांकाने विजयी झाला. विजयी सर्व विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे मनस्वी आभार. व अभिनंदन. अतीशय आनंदी वातारणात ही स्पर्धा संपन्न झाली.

## कांतीलाल पानसरे यांची जागतिक विमा परिषदेसाठी निवड



**आष्टी। प्रतिनिधी**

तालुक्यातील पिंपरखेड येथील कांतीलाल पानसरे यांची अमेरिकेतील जागतिक परिषदेसाठी निवड झाली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की गेल्या १५ वर्षांपासून पानसरे हे विमा सेवा देण्याचे काम करत आहेत.अमेरिकेतील होणाऱ्या मिलियन डॉलर राऊंड टेबल एम.डी.आर.टी. या जागतिक विमा प्रतिनिधी परिषदेसाठी आष्टी तालुक्यातील पिंपरखेड येथील रहिवासी कांतीलाल रामदास पानसरे यांची सलग दुसऱ्या वर्षी निवड झाली तालुक्यातील पिंपरखेड सारख्या अत्यंत छोट्या गावातील कांतीलाल पानसरे हे शेतकरी कुटुंबातील असून त्यांनी सलग पंधरा वर्षे ग्रामीण भागात विमा सेवा देण्याचे काम प्रामाणिकपणे करून विमाधारकांचा विश्वास संपादन करीत उत्कृष्ट सेवा प्रदान करीत आहेत.कांतीलाल पानसरे यांच्या या यशाबद्दल माजी मंत्री व आमदार सुरेश धस,वरिष्ठ शाखाधिकारी गायकवाड, देशपांडे आणि विकास अधिकारी गुरुनाथ पवार यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# १६ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या पाटोदा येथील पादुका दर्शन सोहळ्याच्या

## प्रचार प्रसाराच्या गाड्याचा मान्यवरांच्या हस्ते भव्य शुभारंभ

प्रतिनिधी/पाटोदा

अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज दक्षिणपीठ नानिजधाम (महाराष्ट्र) यांचा पादुका दर्शन सोहळा प्रथमच पाटोदा तालुक्यामध्ये १६ फेब्रुवारी २०२४ शुक्रवार स्थळ, बाळू पाटलाची शेती, पारगाव रोड, पाटोदा. येथे पार पडत आहे या कार्यक्रमाच्या प्रचार प्रसाराच्या गाड्यांचा भव्य शुभारंभ मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये पार पडला.

या पादुका दर्शन सोहळ्यामध्ये हजारोच्या संख्येने जिल्ह्यातील भाविक भक्त उपस्थित राहणार आहेत कार्यक्रमाची रूपरेषा १६ फेब्रुवारी रोजी सकाळी पाटोदा येथील शिवाजी चौकातून पादुकांची वाद्याच्या गजरामध्ये रॅली निघणार आहे, त्यानंतर कार्यक्रम स्थळी गेल्यानंतर मान्यवरांच्या हस्ते सामाजिक उपक्रमाचे वितरण होणार आहे, यानंतर मान्यवरांचे मनोगत होईल, त्यानंतर गुरु पूजन होईल, त्यानंतर प्रवचन होईल, त्यानंतर भक्त दीक्षा चा कार्यक्रम होईल, त्यानंतर पादुका दर्शन होतील, आणि महाप्रसाद होईल असा दिवसभराचा भक्तिमय वातावरणामध्ये कार्यक्रम होणार आहे तरी जिल्ह्यातील भाविकांनी याचा लाभ घ्यावा ही स्व-स्वरूप संप्रदाय, बीड जिल्हा, यांच्या वतीने सर्वांना निमंत्रण आहे.

आजच्या या पादुका दर्शन सोहळ्याच्या प्रचार प्रसाराच्या गाड्यांच्या शुभारंभ प्रसंगी उपस्थित मान्यवर, पाटोदा नगरपंचायत चे नगराध्यक्ष, राजू भैय्या जाधव, जिल्हा परिषद सदस्य, प्रकाश दादा कवठेकर, पाटोदा नगरपंचायत चे माजी नगराध्यक्ष, बळीभाऊ पोटे व त्यांच्यासोबत सोबतचे इतर मान्यवर, स्व-स्वरूप संप्रदायाचे बीड जिल्हा अध्यक्ष, दत्तात्रेय घरत साहेब, बीड जिल्हा, सचिव



कुठे साहेब, बीड जिल्हा शिबिर प्रमुख, राम सानप साहेब, पाटोदा संपर्कप्रमुख, जगताप साहेब, पाटोदा तालुकाप्रमुख, पवार साहेब, पंडित सर, नवनाथ साळुंखे साहेब, भारत लोखंडे, अर्जुन तनपुरे, विनोद कदम, मनीष डोरले, त्रिंबक आरसूळ, बाबू कदम, गोरख मुळीक , मस्के साहेब, डफाळ साहेब, रमेश कदम, शाम राजगुरू, गणपत मामा घुंबरे, सुरेश औटे, सकुंडे साहेब, साळुंखे ताई, मस्के ताई, कदम ताई आदी मान्यवरांच्या उपस्थितीती मध्ये कार्यक्रम संपन्न झाला.

पान १ वरून...

**केवळ वीस...**

ते आढाव यांना म्हणाले, की पुण्याला शिकणार्या तुमच्या मुलाने मुलीची छेड काढली आहे. त्याचा फोन आला होता. ते प्रकरण मिटवायचे असेल तर दहा लाख रुपये द्यावे लागतील.

मात्र ॲड. आढाव यांनी, 'माझ्याकडे पैसे नाहीत. आपण पुण्याला जाऊन समोरासमोर बसून प्रकरण मिटवू,' असे सांगितले. आरोपी मात्र 'आधी पैसे द्या' यावरच अडून बसले. नंतर 'मॅडमकडे पैसे असतील,' असे आढाव म्हणाले. मग त्यांनी फोन करून पत्नी मनीषा आढाव यांनाही बोलावून घेतले. त्यांना आणण्यासाठी आरोपी शुभम महाडिक गेला होता. ॲड. मनीषा आल्यानंतर त्यांनाही मोटारीत बसवले, दोघांचे हात-पाय बांधले आणि सर्व जण मानोरीतील त्यांच्या घरी गेले. वकिलाच्या घरी कामगार होता. त्याला वकिलामार्फत फोन करून निघून जाण्यास सांगितले.

दुपारपासून रात्री आठ वाजेपर्यंत त्यांच्यात पैशांबाबत चर्चा सुरू होती. ॲड. मनीषा आढाव यांच्या खात्यावरील ६४ हजार व २० हजार ॲड. राजाराम आढाव यांच्या खात्यावर टाकून घेतले आणि आढाव यांचे एटीएम कार्ड आरोपींनी ताब्यात घेतले. पिनही विचारला. परंतु, वकील दाम्पत्य त्यांना पैसे देण्यास नकारच देत होते. त्यानंतर पुन्हा आरोपी वकील दाम्पत्याला घेऊन ब्राह्मणी शिवारातील वनीकरणात घेऊन गेले. तेथे आरोपींनी डोक्यात पिशवी टाकून श्वास गुदमरवून त्यांचा खून केला. त्यानंतर मृतदेह उंबरे स्मशानभूमीजवळील विहिरीत टाकले.

किरण दुशिंगला ताब्यात घेतल्यानंतर तो बोलता झाला आणि खुनाचा आणि त्याच्या विकृत मानसिकतेचाही उलगडा झाला. या तपासात पोलिस निरीक्षक दिनेश आहेर, उपनिरीक्षक तुषार धाकराव, पोलिस अंमलदार मनोहर गोसावी, रवींद्र कर्डिले, संदीप पवार, सचिन अडबल, भाऊसाहेब काळे यांच्या पथकाने विशेष भूमिका बजावली.

त्या मोटारीने केला तपासाचा मार्ग प्रशस्त

उंबरे येथून वकील दाम्पत्याची मोटार न्यायालयाच्या आवारात उभी करण्यासाठी शुभम महाडिक गेला होता. राहुरीच्या पेट्रोलिंग पथकाने त्याला पाहिले तेव्हा आरोपींची पळापळ झाली. त्या मोटारीत पोलिसांना तपासात महत्त्वपूर्ण ठेरलेल्या काही महत्त्वाच्या वस्तू मिळाल्या.

ते सिम कार्ड ठरले तपासाचा दुवा

आरोपी किरण दुशिंग संगमनेर जेलमध्ये असताना त्याची एका आरोपीशी ओळख झाली. या गुन्ह्यात किरणने त्या आरोपीच्या नावावर असलेले सिम कार्ड फोन करण्यासाठी वापरले. त्यामुळे स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना दुशिंगपर्यंत पोहोचण्यास मदत झाली.

**बॅनर हटवण्यात ...**

पोलीस आणि नगरपालिका प्रशासनाने शहरातील नगर रोड, जालना रोड सह सर्वच बॅनर हटवावेत अशी नागरीकांची ईच्छा असताना मुख्याधिकारी नगरपालिका बीड यांनी अखिल भारतीय नाट्य परिषदेने बॅनर लावण्यासाठी परवानगी घेतली असुन ते सोडून ईतर बॅनर पाठवले आहेत.अशी पोलिस प्रशासनाला माहिती देत त्यांची दिशाभूल केल्याचे दिसून येत आहे.एकंदरीतच नगरपरिषद प्रशासनाने पुन्हा एकदा बोटचेपेपणाची भुमिका घेतली आहे.

**गर्भपात केंद्र व कुटुब...**

आहे. अणि त्यानंतर प्रत्येक महिन्याला पहिल्या २५ कुटुब नियोजन शत्रकिया मोफत केल्या जाणार आहेत. तसेच गर्भपात सुविधा अल्प दरामध्ये सुरू केली आहे.

या साठी मजलागाव चे सुप्रसिद्ध सर्जन डॉ. सुरेश साबळे सर स्वतः सेवा देणार आहेत.

या सुविधाचा गरजूनी लाभ घ्यावा असे आव्हान साबळे हॉस्पिटल येथील सुप्रसिद्ध सर्जन डॉ. दिनकर मस्के यांनी केले आहे.

# कऱ्हेवडगांव विविध सेवा सोसायटी राम खाडे यांच्या ताब्यात

## जय मल्हार कृषी विकास पॅनलचा दणदणीत विजय

**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील कऱ्हेवडगांव विविध कार्यकारी सहकारी विकास सेवा संस्था मर्या.कऱ्हेवडगाव संचालक मंडळ निवडीसाठी दि. २८रोजी विक्रमी मतदार झाले होते. जय मल्हार कृषी विकास पॅनलचे सर्वच उमेदवार मोठ्या मताधिक्याचे विजयी झाले.

या निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा अध्यक्ष रामभाऊ खाडे व कऱ्हेवडगावचे मा. सरपंच जालिंदर गायकवाड यांच्या नेतृत्वाखालील जय मल्हार कृषी विकास पॅनलने दणदणीत विजय एक हाती सत्ता मिळवत आ. सुरेश धस पुरस्कृत स्व.लोकनेते गोपीनाथ मुंडे पॅनलचा सुपडा साफ झाला आहे.

जय मल्हार कृषी विकास पॅनलने एक जागा बिनविरोध मिळवली होती. या निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा अध्यक्ष रामभाऊ खाडे यांच्या नेतृत्वाखाली जय मल्हार कृषी विकास पॅनल व आ. सुरेश धस पुरस्कृत कऱ्हेवडगावचे सरपंच परिवंत गायकवाड, कऱ्हेवाडी चे सरपंच छाया गायकवाड यांच्या नेतृत्वाखालील स्व. स्व.लोकनेते गोपीनाथ मुंडे पॅनल यांच्यामध्ये लढत झाली होती. संचालक पदाच्या १२ जागेसाठी २४ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात उतरले होते.यामध्ये सर्वसाधारण खातेदार/कर्जदार या मतदारसंघातुन आठ जागेसाठी १६ उमेदवार, महिला राखीव प्रतिनिधी मतदारसंघातुन २जागेसाठी ४ उमेदवार, इतर मागासवर्गीय प्रतिनिधी १जागेसाठी दोन उमेदवार, भटक्या विमुक्त जाती अथवा विशेष मागास प्रवर्ग प्रतिनिधी एका जागेसाठी २ उमेदवार उभे होते.आष्टी तालुक्यातील कऱ्हेवडगांव विविध कार्यकारी सहकारी विकास सेवा संस्था मर्या.कऱ्हेवडगांव संचालक मंडळ निवडणूक चुरशीने मतदान झाले.१२ जागासाठी २४ उमेदवार रिंगणात उतरले होते . सायंकाळी ५वा. निकाल जाहीर झाला यामध्ये जय मल्हार कृषी विकास पॅनलचे सर्वच उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी झाले आहेत. निकाल जाहीर होताच विजयी उमेदवार व कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण करत फटाक्यांची आतिषबाजी करून जल्लोष केला. जालिंदर उत्तम गायकवाड हे अनुसूचित जाती मधुन बिनविरोध निवडून गेले आहेत.

निवडणूक निर्णय अधिकारी बी.जी.शिंदे यांच्या सह कर्मचाऱ्यांनी कामकाज पाहिले.

### विजयी उमेदवारांची नावे

सर्व साधारण खातेदार १) रामदास सुर्याभान खाडे २) अर्जुन भिमराव खांडवे ३) परमेश्वर वामन नागरगोजे ४) जालिंदर बाबासाहेब नागरगोजे ५) राजेंद्र दादासाहेब नागरगोजे ६) बाबासाहेब नाना सांगळे ७) रावसाहेब रघुनाथ सांगळे ८) सोपान पाटीलब सांगळे महिला राखीव १) शितल हनुमान सांगळे २) संगिता दिनकर सांगळे ओबीसी १) नवनाथ सिताराम विधाते भटक्या विमुक्त जाती १) राजेंद्र प्रल्हाद पुरी अनुसूचित जाती जालिंदर उत्तम गायकवाड (बिनविरोध)



## सारथी व एमकेसीएल च्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी भविष्य घडवावे!

**वडवणी । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजी महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था सारथी पुणे यांच्या माध्यमातून आदित्य कॉम्प्युटर्स वडवणी यांच्या विद्यार्थ्यांन मार्फत २६ जानेवारी २०२४ रोजी ध्वजारोहनाच्या कार्यक्रमाच्या वेळी छत्रपती संभाजी महाराज सारथी युवा व्यक्तिमत्व विकास व संगणक कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम (उड्चड - ऊएएझ) या कोर्स बद्दल तेथील ग्रामस्थांना व उपस्थित विद्यार्थ्यांना स्वतःच्या पायावर उभे राहता येईल या स्पर्धेच्या युगात मराठा समाजातील युवक व युवती टिकले पाहिजेत हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून सारथी व एमकेसीएल यांच्या वतीने सहा महिन्याचा संगणक डिप्लोमा कोर्स अगदी मोफत देण्यात येत आहे या कोर्सेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्याचे काम सारथी व एमकेसीएलच्या अंतर्गत राबविले जात आहे अशी माहिती विद्यार्थी रोहिणी सखाराम सुरवसे हिने चिंचाळा येथील ग्राम पंचायत कार्यालयामध्ये व विद्यार्थी संभाजी नामदेव लांडे यांने सोना खोटा ग्रामपंचायत कार्यालय मध्ये ध्वजारोहणाच्या दिवशी जाऊन एमकेसीएल व सारथी मार्फत (उड्चड - ऊएएझ) या कोर्स बद्दल ग्रामस्थांना व विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती देण्यात आली.

# ओबीसी, भटक्या जमाती व विशेष प्रवर्गाचे आरक्षण वाचवा

## आ. सोळंकेंच्या निवासस्थांनावर, तहसिल कार्यालयावर सकल ओबीसी समाजाचे निदर्शने आंदोलन

**माजलगाव। प्रतिनिधी**

राज्य शासनाने मराठा आरक्षणासंदर्भात सगेसोयरे या शब्दाची व्याख्या बदलून समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार ब चा २६ जानेवारीला मसुदा काढला आहे. त्यामुळे ओबीसी समाजात भितीचे वातावरण निर्माण झाले असून हा निर्णय मुळ ओबीसींवर अन्याय करणारा आहे. त्याचबरोबर शिंदे समिती ही घटनात्मक नसतांना शिंदे समितीच्या शिफारसीवरून कुणबी प्रमाणपत्र देणे घटनाबाह्य आहे का ? असा सवाल करत ओबीसी, भटक्या जमाती व विशेष प्रवर्गाचे आरक्षण वाचवा व त्यांच्या विवीध हरकतीचे निवेदन आमदार प्रकाश सोळंके यांना देत त्यांच्या निवासस्थांनावर स. ११.३० वाजता निदर्शने तर तहसिल कार्यालयावर स. ११.०० वा. सकल ओबीसी समाजाच्या वतीने निदर्शने आंदोलन करण्यात आले.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राज्य सरकार नियुक्त शिंदे समिती ही फक्त मर्यादित समिती असून मागासवर्ग आयोग नसतांना मराठा कुणबी जात नोंदीचा शोध घेत



कोणत्याही आयोगाने मराठा समाजाला मागास ठरविलेले नसतांना मराठा कुणबी प्रमाणपत्राचे वितरण केले जात आहे. संविधानात अर्टिकल ३८८ ब प्रमाणे इंदिरा साहनी निकालाच्या आधारे संबंधित जाती घटकांबाबत इंटिग्रिटी किंवा असक्ती नसलेले सदस्य नियुक्त करणे अपेक्षित असतांना आसक्ती असलेल्या व्यक्तींच्या मागासवर्ग आयोगावर नियुक्त कशा केल्या. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल डॉ. जयश्री पाटील विरूध्द मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य खटल्यातील निकालानुसार अपेक्षित असलेल्या मागासवर्ग आयोगाच्या सदस्यांना इंटिग्रीटीनुसार नियुक्त्या का केल्या नाहीत ? ओबीसी प्रवर्गातील विवीध जातीचे घटक आहेत. ओबीसी प्रवर्गातील मागासलेपण पिढ्यान - पिढ्यांपासून आजपर्यंत कायम आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे मराठा समाज एसईबीसी/ओबीस ठरत नाही हे अनेक वेळा स्पष्ट झाले आहे. त्यामुळे मराठा समाजाच्या दबावाला बळी पडून सरकारने घेतलेल्या या बेकायदेशीर आणि मागासर्गीयांसाठी अन्यायकारक असलेल्या या निर्णयाला विरोध करत २६ जानेवारीचा अधिसुचनेचा मसुदा रद्द करण्यात यावा, राज्य मागासवर्ग आयोग व शिंदे समिती रद्द करण्यात यावी, चुकीच्या कार्यपध्दतीने व बेकायदेशीर रित्या वितरीत होणा-या सदर मराठा - कुणबी किंवा कुणबी मराठा प्रामणपत्र वितरणास स्थगिती द्यावी आणि राज्यातील गोरगरिब ओबीसी, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाचे आरक्षण वाचवावे अशी मागणी सकल ओबीसी समाजाच्या वतीने आमदार प्रकाश सोळंके तसेच तहसिलदार वर्षा मनाळे यांचेकडे करण्यात आली आहे.

# पालखी मार्गासाठी भाई थावरेंचे ठिय्या आंदोलन



## कारवाई करण्याचे ग्रामीण माजलगाव पोलिसांचे आश्वासन

**माजलगाव। प्रतिनिधी**

शहरातून जाणार्या खामगाव ते पंढरपूर पालखी मार्गावर ठिकठिकाणी भेगा पडल्या आहेत. यामुळे झालेल्या अपघातात दहा जणांचा मृत्यू झाला असून संबंधीत गुत्तेदार व इंजिनिअर यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नोंदवावा या मागणीसाठी शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी आज १ फेब्रुवारी रोजी ग्रामीण पोलिस ठाणे माजलगाव येथे ठिय्या आंदोलन केले. यावेळी ग्रामीण पोलिसांनी यापुढे रस्त्यावर भेगा पडल्यावर संबंधीताविरुध्द कारवाई करणार असल्याचे लेखी कळविले आहे.

माजलगाव शहरातून जाणार्या खामगाव ते पंढरपूर पालखी मार्गाचे काम अतिशय बोगस करण्यात आले आहे. हा सिमेंट रस्ता करताना रस्त्याची दबाई व्यवस्थित केली नाही तसेच दर्जेदार काम न केल्याने या मार्गावर दुचाकीचे चाक बसेल अशा आकाराच्या भेगा ठिकठिकाणी पडल्या आहेत. माजलगाव ते तेलगाव पर्यंत या रस्त्यावर मोठ मोठ्या भेगा पडल्या आहेत. यामुळे आजपर्यंत २५ हून अधिक दुचाकीस्वार गंभिर जखमी होऊन त्यांना अपंगत्व आले आहे तर दहा हून अधिक जणांचा मृत्यू झाला आहे. यामुळे यामुळे झालेल्या अपघातात दहा जणांचा मृत्यू झाला असून संबंधीत गुत्तेदार व इंजिनिअर यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नोंदवावा या मागणीसाठी शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे आज माजलगाव येथील ग्रामीण पोलिस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन केले. यावेळी ठाण्याचे पोलिस निरीक्षक यांनी पालखी मार्गासंदर्भात कार्यकारी अधिकारी सो.म.रा.र.वि.मार्या शिबिर कार्यालय जालना यांना कळविले असून या रस्त्याचे काम उच्च प्रतीचे करावे असा ई मेल केला असून यापुढे रस्त्यावर पडलेल्या भोगामुळे अपघात झाल्यास संबंधीताविरुध्द योग्य कार्यवाही करणार असल्याचे लेखी पत्र दिले.

## माजलगाव तालुक्यात तरुणीचे उद्योगात पहिले पाऊल

# तरुणीने नोकरीच्या पाठीमागे न लागता स्वत:चे उद्योग निर्माण करावेत - बाबुराव पोटभरे

**माजलगाव। प्रतिनिधी**

तालुक्यात हरकी लिमगाव येथील सुशिक्षित बेकार तरुणी कु.सीमा निसर्गंध या तरुणीने हारकी लिंमगाव माऊली फाटा येथे तेल घाणा उद्योग सुरू करून उद्योगात पहिले पाऊल टाकले असुन उच्चशिक्षित तरूणीने नोकरीच्या पाठीमागे न लागता स्वतःचे उद्योग निर्माण करावे असे आवाहन उद्धाटना प्रसंगी बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांनी केले.

माजलगाव तालुक्यातील हरकी लिमगाव माऊली फाटा येथे महासंजवनी या नावाने तेल घाणा उद्योग कु.सीमा निसर्गंध या उच्चशिक्षित तरुणीने सुरू करून



बेरोजगारीवर मात करत तरुणा पेक्षा मी कमी नाही असे दाखवून देत तरुण मुलीपुढे नवा आदर्श निर्माण केला या उद्योगाचे उद्धाटन दि ३१जानेवारी बुधवार रोजी बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांच्या हस्ते करण्यात आले.कु

सीमा निसर्गध या उच्चशिक्षित बेरोजगार मुलीने बेरोजगारीला न डगमगता जिल्हा उद्योग केंद्र बीड मार्फत भारतीय स्टेट बँक शाखा तालखेड च्या सहकार्याने उद्योग क्षेत्रात पहिले पदार्पण केले आहे.समाजातील सुशिक्षित तरुण तरुणींनी नोकरी च्या पाठीमागे न लागता स्वतःचे उद्योग धंदे निर्माण करावे असे आवाहन बाबुराव पोटभरे यांनी केले.या वेळी माजलगाव येथील सुंदररावजी सोळंके महाविद्यालयच्या गृह विभाग प्रमुख प्रा.भिसे मॅडम,मस्के मॅडम यांनी ही आपले मोलाचे विचार मांडले या वेळी गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याकडून

## ७ जानेवारी अखेरील पहिला हप्ता प्रति टन रु.२७००/- प्रमाणे जमा - चेअरमन विरेंद्र सोळंके

**माजलगाव। प्रतिनिधी**

लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याचा सन.२०२३-२४ चा ऊस गळीत हंगाम सुरु असुन दिनांक २८/१२/२०२३ ते ०७/०१/२०२४ या कालावधीत गाळपास आलेल्या ऊस बिलाचा पहिला हप्ता प्रति मे.टन रुपये २७००/- प्रमाणे ऊस उत्पादक शेतकरी यांचे बँक खाती जमा केला असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन विरेंद्र सोळंके यांनी दिली.

या चालु गळीत हंगामामध्ये आ. प्रकाश सोळंके, उपाध्यक्ष साखर संघ मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याचे ऊस गाळप सुरु असुन दिनांक ३१/०१/२०२४ अखेर ८७ गाळप दिवसामध्ये ४३२१०० मे.टन ऊसाचे गाळप करुन ९.९० टक्के सरासरी साखर उता-याने २६०८०० क्विटल शुभ्र साखरेचे उत्पादन घेण्यात आलेले आहे.चालू हंगामात कारखान्याकडील इथेनॉल व को. जन प्रकल्प कार्यान्वीत असुन आजअखेर सिरप इथेनॉल ८६५७७१८ लिटर आणि बी. हेवी इथेनॉल २३०२९९० लिटरचे उत्पादन झाले असुन २१११६४०० युनीट विज महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीस वितरीत केलेली आहे. दिनांक २७/१२/२०२३ पर्यंत गाळप झालेल्या ऊसाचा पहिला हप्ता रुपये २७००/- प्रमाणे होणारी रक्कम यापूर्वीच ऊस उत्पादकांचे बैंक खाती वर्ग करण्यात आलेली होती. पुढील कालावधीत म्हणजेच दिनांक २८/१२/२०२३ ते ०७/०१/२०२४ या कालावधीत ५८८३५.७३१ मे.टन गाळप झालेल्या ऊसाचा पहिला हप्ता प्रती मे.टन रु.२७००/- प्रमाणे होणारी एकुण रक्कम रुपये १५.८९ कोटी ही दिनांक ३१/०१/२०२४ रोजी संबंधीत ऊस उत्पादकांचे बैंक खाती वर्ग केलेली आहे. तरी वरील कालावधीत ज्या ऊस उत्पादकांचा ऊस गाळपास आलेला आहे त्यांनी आपल्या नजिकच्या बँकेशी संपर्क साधुन आपल्या ऊस बिलाची रक्कम घेवुन जावी असे आवाहन कारखान्याचे चेअरमन विरेंद्र सोळंके यांनी केले आहे.



माजलगाव:-राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या (शरद पवार ) गटाच्या ओबीसी विभागाच्या प्रदेश उपाध्यक्ष पदी डॉ.भगवानराव सरवदे यांची व राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या प्रदेश सचिव पदी प्रा.श्रीहारी काळे यांची निवड झाल्या बद्दल सत्कार करुन शुभेच्छा देताना माजी जिल्हा परिषद सदस्य डॉ.श्रीरामजी खळगे,माजी संचालक कुषी उत्पन्न बाजार समिती वडवणी दिलीपराव मकसरे, मनसेचे तालुकाध्यक्ष धोंडीराम जाधव,शिवसेना (ठाकरे गट) तालुका समन्वयक गोरख टाकणखार व पत्रकार ज्योतीराम पांढरपोटे

## उदय सामंत, अर्जुन खोतकर यांच्या प्रमुख उपस्थितीत आज शिवसेनेची महत्वपूर्ण बैठक!

### सर्व पदाधिकाऱ्यांनी आवर्जून उपस्थित राहावे- जगताप, मुळूक, खांडे

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते मा.ना. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री तथा शिवसेना उपनेते ना. उदयजी सामंत साहेब व उपनेते , विभागीय संपर्कप्रमुख अर्जुन भाऊ खोतकर साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आज दिनांक-०२/०२/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता. बीड शहरातील हॉटेल ग्रँड यशोदा, बार्शी रोड येथे बीड जिल्हा शिवसेना, युवासेना, महिला आघाडी तसेच अंगीकृत संघटनांचे पदाधिकारी, आजी-माजी लोकप्रतिनिधी यांची महत्त्वाची बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीला मार्गदर्शन





करण्यासाठी लोकसभा संपर्कप्रमुख विजय पाटील संपर्कप्रमुख भाऊसाहेब मोरे यांचीही उपस्थिती राहणार आहे.

उदयजी सामंत, अर्जुन भाऊ खोतकर, विजय पाटील, भाऊसाहेब मोरे यांच्या उपस्थितीमध्ये संपन्न होत असलेल्या बैठकीत महत्वपूर्ण मुद्यांवर चर्चासत्र तथा मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या महत्वपूर्ण बैठकीसाठी बीड जिल्हा शिवसेना, युवासेना, महिला आघाडी तसेच अंगीकृत संघटनांचे पदाधिकारी, आजी-माजी लोकप्रतिनिधी यांनी उपस्थित रहावे असे आवाहन बीड शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन मुळुक आणि कुंडलिक खांडे यांनी केले आहे.

दैनिक

# मराठवाडा पत्र

पान -४
PAGE - 4

बीड जिल्हा

बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )

शुक्रवार,दि.०२ फेब्रुवारी २०२४
FRIDAY DT.02 FEBRUARY 2024

## गेवराईत पहिल्याच इंन्ट्रीत पो.नि. प्रविणकूमार बांगर यांची धडाकेबाज कारवाई

### कुंटणखाण्यावर छापा;पाच जिल्हातील पाच महिलांची केली सुटका

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई पोलीस स्टेशनला नवनिर्वाचित पोलीस निरीक्षक प्रविणकूमार बांगर यांनी नुकताच पदभार घेतला असुव त्यांनी गेवराई तालुक्यातील काम केलेल्या तलवाडा येथील खाकी वर्दीचा हिसका कसा असतो हे बुधवार रोजी सायंकाळी गेवराई तालुक्यातील पाडळसिंगी येथे केलेल्या कारवाईतून आपल्या पहिल्याच इंट्रीचा गुन्हारी करणा-यांसाठी हिसका दाखवला आहे.गेवराई तालुक्यातील पाडळसिंगी येथील टोलनाक्याजवळील पत्र्याच्या शेडमध्ये चालणाऱ्या कुंटणखान्याचा पर्दाफाश करत पाच महिलांची सुटका केली,तसेच एका एजंटासह आंटीला ताब्यात घेतले. ही कारवाई बुधवारी सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास केली.सुंदर ज्ञानोबा भिसे (वय ४० रा. बीड) व राधाबाई लोखंडे (वय ६० रा.धारूर) असे पकडलेल्या आरोपींची नावे आहेत.हे दोघेही एकमेकांच्या ओळखीचे असून, परजिल्ह्यातील महिलांना बीडमध्ये आणून त्यांच्याकडून वेश्या व्यवसाय करवून घेत होते.गेवराई पोलीस ठाणे हद्दीत पुर्वी असलाले पो.नि.धनंजय फराटे यांच्या कार्यकाळात गेवराई शहरासह ठाणे हद्दीतील ७० गावांमध्ये अवैध धंद्याचा खुलेआम उंच्चाक वाढत या धंद्यातून त्यांनी आर्थिकवर आधिक भर दिल्याने गुन्हेगारीचे प्रमाण वाढून त्यांची वचक राहिली नव्हती.त्यांच्या अशा हाफ्तेखोरीमुळेच त्यांची वरिष्ठांनी बदली केली असावी असे आज देखील गेवराई मध्ये नागरिकांमधून बोलले जात आहे.त्यांच्या जागी दबंग आधिकारी म्हणून गेवराई तालुक्यात ओळख असलाले पोलीस निरीक्षक प्रविणकूमार बांगर यांची नियुक्ती नुकतीच गेवराई पोलीस ठाण्याला करण्यात आली आहे.त्यांनी बुधवारी सायंकाळी पहिल्याच इंन्ट्रीत गेवराईतील गुन्हेगारी करणा-या कारवाईचा पहिला हिसका




दाखविला.पोलिस निरीक्षक प्रवीणकुमार बांगर यांनी बुधवारी सायंकाळी डमी ग्राहक पाडळसिंगी येथील टोल नाक्याजवळ असलेल्या एका पात्राच्या शेडमध्ये पाठवून कुंटखाण्याचा पर्दाफाश केला.यावेळी सातारा,इचलकरंजी,अमरावती,पुणे येथील पाच महिलांची सुटका केली. घटनास्थळावरून काही साहित्यही जप्त करण्यात आले आहे.त्यांच्याविरोधात गेवराई पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली होती.ही कारवाई पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर,अपर अधीक्षक सचिन पांडकर,उपअधीक्षक निरज राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक प्रवीणकुमार बांगर,सहायक निरीक्षक संतोष जंजाळ,संजय राठोड,राजू भिसे,रेणुका बहिरवाळ, संजय सोनवणे आदींनी केली आहे.दरम्यान पोलीस निरीक्षक प्रविणकूमार बांगर यांनी यापुडे देखील वाळू चोरी बाबत व अवैध धंद्यान बाबत अशाच धडाकेबाज कारवाया करून गेवराईतील गुन्हेगारी मोडीत काढून गुन्हेगारांचे कर्दनकाळ व्हावे अशी मागणी आता नागरिकांमधून होऊ लागली आहे.

### परळी वैजनाथ शहरातील मराठा समाज व खुल्या प्रवर्गातील कुटूंबाचे सर्वेक्षण राहिले असल्यास

## नगर परिषद कार्यालयाशी संपर्क साधावा-मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे

परळी । प्रतिनिधी

राज्य मागासवर्ग आयोगामार्फत मराठा समाज व खुल्या प्रवर्गातील नागरिकांचे प्रत्यक्ष सर्वेक्षण करण्यास सुरु असून हे सर्वेक्षण ०२ फेब्रुवारी २०२४ पर्यंत करावयाचे आहे. तरी परळी वैजनाथ शहरातील कुटूंबाचे सर्वेक्षण राहिले असल्यास तात्काळ नगर परिषद कार्यालयाशी संपर्क करा असे आवाहन मुख्यधिकारी त्र्यंबक कांबळे यांनी केले आहे.राज्य मागासवर्ग आयोगामार्फत मराठा समाज व खुल्या प्रवर्गातील नागरिकांचे दि. २३ जानेवारी २०२४ रोजी पासून प्रत्यक्ष सर्वेक्षण करण्यास सुरु असून हे सर्वेक्षण ०२ फेब्रुवारी २०२४ पर्यंत करावयाचे आहे. परळी वैजनाथ शहरातील नागरिकांचे सर्वेक्षण नगर परिषदेचे मुख्यधिकारी त्र्यंबक कांबळे व उपमुख्याधिकारी संतोष रोडे यांच्या मार्गदर्शनाखाली १ समन्वयक, ८ पर्यवेक्षक आणि १२० प्रगणकांमार्फत सदरील सर्वे पूर्ण करण्यात येत आहे. ०२ फेब्रुवारी २०२४ ही सर्वेक्षणाची शेवटची तारीख आहे. शहरातील मराठा व खुल्या प्रवर्गातील समाजाचा सर्वे पूर्ण झालेला असून ज्या कुटुंबांचा सर्वेक्षण नजर चुकीने करायची शिल्लक राहिले असेल त्यांनी दि.०२ फेब्रुवारी पर्यंत समन्वयक पंकज दहातोंडे (९९७०८ १३१५४) यांच्याशी संपर्क साधावा. अशा राहिलेल्या कुटूंबाचे सर्वेक्षण करण्यासाठी तात्काळ नगर परिषदेची टीम मार्फत येऊन सर्वेक्षण पूर्ण करण्यात येईल असे आवाहन नगर परिषदेचे मुख्यधिकारी त्र्यंबक कांबळे व उपमुख्याधिकारी संतोष रोडे यांनी केले आहे.



नागरिकांनी सहकार्य करावे-नगर परिषदेचे मुख्यधिकारी त्र्यंबक कांबळे व उपमुख्याधिकारी संतोष रोडे

राज्य मागासवर्ग आयोगामार्फत मराठा समाज व खुल्या प्रवर्गातील नागरिकांचे प्रत्यक्ष सर्वेक्षण करण्याचे काम सुरु असून हे सर्वेक्षण ०२ फेब्रुवारी २०२४ पर्यंत करावयाचे आहे. १ समन्वयक, ८ पर्यवेक्षक आणि १२० प्रगणकांमार्फत सर्वेक्षण सुरु आहे. तरी परळी शहरातील नागरिकांनी समन्वयक, पर्यवेक्षक व प्रगणक हे माहिती विचारून पूर्ण अचूक माहिती घेऊन घरोघरी जाऊन काम करत आहेत. त्यांना सर्वेक्षणाच्या कामासाठी सहकार्य करावे असे आवाहन नगर परिषदेचे मुख्यधिकारी त्र्यंबक कांबळे व उपमुख्याधिकारी संतोष रोडे यांनी केले आहे.

## महात्मा ज्योतिबा फुले यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून शिक्षकांनी कार्य करावे - प्रो.डॉ.प्रल्हाद लुलेकर

### बीड जिल्हा मुप्टा संघटना आयोजित क्रांतीबा जोतिबा फुले राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात साजरा

बीड । प्रतिनिधी

महात्मा ज्योतिबा फुले यांनी भारतीय समाजात मोठे सामाजिक परिवर्तन घडविले.शैक्षणिक क्षेत्रात अतुलनीय योगदान दिले.त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून शिक्षकांनी आपले अध्यापनाचे कार्य करावे,असे प्रतिपादन प्रसिद्ध विचारवंत प्रो.डॉ.प्रल्हाद लुलेकर यांनी केले. बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे दि २८ जानेवारी रोजी दुपारी १ वाजता बीड जिल्हा मुप्टा संघटना आयोजित क्रांतीबा जोतिबा फुले राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात पार पडला याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा मुप्टा बीड जिल्हाध्यक्ष प्रा.प्रदिप रोडे, मुप्टाचे संस्थापक सचिव प्रा.सुनिल मगरे यांची विशेष उपस्थिती होती. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून माजी शिक्षण उपसंचालक छ.संभाजीनगर सुधाकर बनाटे, बीड जिल्हा परिषदचे उपशिक्षणाधिकारी नानाभाऊ हजारे, सिल्लोड शिक्षण संस्थाचे अध्यक्ष जनार्धन मस्के, मुप्टा विभागीय अध्यक्ष प्रा.डॉ.संभाजी वाघमारे, मुप्टा विभागीय कार्याध्यक्ष प्रा.डॉ.भास्कर टेकाळे, समर्थ शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सुभाषराव पवळ, प्राचार्य तुपे, धाराशिवचे जिल्हध्यक्ष रवी सुरवसे, कळासकर सर, मुप्टा



बीड जु.विभाग जिल्हाअध्यक्ष प्रा.शशीकांत जावळे, मुप्टा बीड कार्याध्यक्ष प्रा.राम गायकवाड, मुप्टा बीड जिल्हा सचिव प्रा.राम गव्हाणे, मुप्टा प्रा.विभाग जिल्हाध्यक्ष शरद मगर, जिल्हा सचिव शैलेश चिलवंत, बीड मुप्टा मा.विभाग जिल्हाध्यक्ष प्रविण तरकसे, प्रमोद साळवे,प्रा.कोल्ते, प्रा.बाळासाहेब गव्हाणे यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्राप्त पंधरा शिक्षकांना स्मृतिचिन्हे, सन्मानपत्र देऊन त्यांचा सहकुटुंब सहपरिवार गौरव करण्यात आला तसेच आंबेडकरवादी मिशन नांदेडला दोन लाख रुपयांचा धनादेश पाथरी येथील कमल उजगरे, संजय उजगरे यांच्याकडे बीड जिल्हा मुप्टा संघटनेच्या वतीने सुपूर्द करण्यात आला आणि याप्रसंगी मुप्टा न्यूज अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

पुढे बोलताना प्रो.डॉ.लुलेकर म्हणाले की, आदर्श शिक्षकांनी महापुरुषांचा वैचारिक वारसा जपत शैक्षणिक कार्य केले पाहिजे. तसेच वंचित उपेक्षितांना न्याय दिला पाहिजे.जात,धर्म,प्रदेश याच्या भिंती तोडून माणूसपण जपले पाहिजे,असे मत व्यक्त केले. यावेळी प्राध्यापक सुनील मगरे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना मै कल भी सफर मे था, मै आज भी सफर मे हू ,फर्क सिर्फ इतना है कल मे अपनों के तलाश मे था, आज मे खुद की तलाश मे हु हा शेर म्हणत मुप्टा संघटनेच्या कार्यशैलीवर प्रकाश टाकत भविष्यातील विविध आव्हाने आणि संघटनेचा लढा याबद्दल सविस्तर माहिती सांगितली. अध्यक्षीय भाषणात मुप्टा बीड जिल्हाध्यक्ष प्रा. प्रदिप रोडे यांनी गेली पंधरा वर्षे सातत्यपूर्ण क्रांतीबा जोतिबा फुले राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात पार पडतो असे सांगितले. सदरील आदर्श शिक्षक पुरस्कार हा प्रस्ताव न मागवता पुरस्काराची निवड ही शिक्षकाच्या सामाजिक कार्यावरून केली जाते असे त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले. तसेच संघटनेने केलेल्या विविध सामाजिक कार्यावर त्यांनी प्रकाश टाकला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुप्टा प्रा.वि.जिल्हाध्यक्ष शरद मगर, सूत्रसंचालन प्रो.डॉ. मनोहर सिरसाट यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा.राम गायकवाड यांनी मानले.




## राम जाधव यांची राष्ट्रवादी काँग्रेस बीड जिल्हा युवक पदी निवड

बीड ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील दगडी शहाजनपुरचे माजी सरपंच राम जाधव यांनच्या कामाची पावती म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश अध्यक्ष श्री.जयंतराव पाटील यांनच्या आदेशावरून पक्षाने एक जबाबदारी म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस बीड जिल्हा युवक पदी निवड बीड चे लोकप्रिय आमदार मा.संदीप(भैय्या)क्षीरसागर साहेब,युवक प्रदेश अध्यक्ष-मा.महेबूब भाई शेख,राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष-मा.बबन भाऊ गिते, यांनच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले.त्याप्रसंगी दादा हातांगळे,झुंजार भैय्या धांडे, मनोज फरके,दत्ता काशीद,अभय बीडकर,त्रिंबक शेळके,अशोक गोरे,संतोष चव्हाण सह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्तित होते.राम जाधव यांना नियुक्ती पत्र देऊन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## विद्यानगर ता .ब्रम्हापुरी येथे वंचित बहूजन महिला आघाडी च्या जिल्हा उपाध्यक्षा लिना जी रामटेके यांच्या उपाध्यक्षते खाली



प्रतिनिधी । बीड

तालुका ब्रह्मापुरी विद्यानगर येथे महिला वंचित बहूजन आघाडी च्या वतिने महत्त्वाच्या विषयावर बैठक बोलवण्यात आली होती ... या बैठकी च्या आध्यक्षस्थानी महिला वंचित बहूजन आघाडी च्या चंद्रपुर जिल्हा उपाध्यक्षा लिंना जी रामटेके ह्या होत्या .. बैठकी की ब्रम्हापुरी तालुका कार्यकाणीच्या महिला कार्यकर्त्यढ मोठ्या प्रमाणात हा जर होत्या .. या बैठकीला संबोधीत लिना जी रामटेके म्हणाल्या की येणाऱ्या लोकसभाची निवडणुका जाहिर झालेल्या आहेत .. चंद्रपुर जिल्हयाची प्रचार यंत्रना हि महिला आघाडी कडे घेवुन जोमाने प्रचाराला लागायचे आहे ... मा . बाळासाहेब आंबेडकर यांनी जो उमेदवार देतील त्यांचा प्रचार आपण वंचित बहूजन महिला आघाडीच्या हातात घेवुन प्रचार करायचा आहे .. तरी सर्वांनी प्रचाराची तयारी करावी आसे शेवटी आपल्या भाषणा त लिंना जी रामटेके यांनी यक्त केले .

## गढी महाविद्यालयाच्या रा.से.यो. शिबिरातून श्रमदान, परिसर स्वच्छता व सामाजिक प्रबोधन

प्रतिनिधी । बीड

कला व विज्ञान महाविद्यालय शिवाजीनगर गढी येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने पंचमुखेश्वर देवस्थान भाटेपुरी येथे दि.२९ जानेवारी ते ४ फेब्रुवारी २०२४ या दरम्यान विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे या शिबिरात श्रमदान, विविध विषयावर जनजागृती रॅली, सांस्कृतिक कार्यक्रम इ. उपक्रम नियमित राबविले जात आहेत. या शिबिराचा एक महत्वाचा भाग म्हणजे दुपारचे बौद्धिकसत्र या सत्रातून विविध सामाजिक व ज्वलंत समस्यावर विद्यार्थी आणि ग्रामस्थांचे तज्ज्ञ व्याख्यात्याद्वारे प्रबोधन केले जात आहे.यामध्ये दि.२९जानेवारी २०२४ रोजी पर्यावरण संवर्धन आणि जलसिंचन या विषयावर प्रमुख प्रा. डॉ. शिवलाल घुगे व डॉ. कलंदर पाठण यांनी सखोल मार्गदर्शन केले. दि ३० जानेवारी २०२४ रोजी प्रमुख वक्ते डॉ.जयराम ढवळे व अध्यक्ष प्रोफे. डॉ धर्मराज कटके यांनी भारतीय संविधान आणि सामाजिक ऐक्य या विषयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सामाजिक ऐक्य टिकून राहण्यामध्ये संविधानाची भूमिका सविस्तर विशद केली.दि.३१जानेवारी २०२४ रोजी प्रमुख वक्त्या प्रा. डॉ. अयोध्या पवळ व अध्यक्ष प्रा. हिरा पोटकुले यांनी बालविवाह निर्मूलन काळाची गरज या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले.दि.१ फेब्रुवारी २०२४रोजी ग्रामविकासात युवकांची भूमिका या विषयावर प्रमुख वक्ते प्रा. रमेश रिंगणे व अध्यक्ष प्रोफे. डॉ. संतोषकुमार यशवंतकर यांनी विविध उदाहरणातून ग्रामविकासतील युवकांची भूमिका स्पष्ट केली. या शिबिरातील विविध उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यासाठी महाविद्यालययाचे प्राचार्य प्रोफे. डॉ. सदाशिव सरकटे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रोफे. डॉ.रामहरी फाटक, प्रा. डॉ. राणी जाधव, प्रा. डॉ.शिवाजी काकडे हे परिश्रम घेत आहेत.

## अध्यात्माच्या माध्यमातून सामाजिक समता निर्माण करण्याचे काम संतांनी केले-माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

प्रतिनिधी । बीड

महाराष्ट्र ही संतांची भूमी असून बीड जिल्ह्यात वै.बंकटस्वामी महाराज यांनी वारकरी संप्रदायाची मोठी परंपरा विस्तारित केली, अध्यात्माच्या माध्यमातून सामाजिक समता निर्माण करण्याचे काम संतांनी केले आहे असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले. मंझेरी हवेली येथे संत ज्ञानेश्वर महाराज मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त श्री संत ज्ञानेश्वर महाराज प्रतिष्ठान च्या वतीने ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. यावर्षी ३२ वा अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आला होता.आज ह.भ.प.वैराग्यमूर्ती रामकृष्ण रंधवे यांच्या कीर्तन प्रसंगी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी भेट दिली. यावेळी ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज मंझेरीकर व तरुण युवक मंडळाच्या वतीने माजी मंत्री क्षीरसागर यांचे स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमास अरुण डाके, विलास बडगे, दिनकर कदम, नानासाहेब काकडे, सुभाष क्षीरसागर, नवनाथ कुलकर्णी, सर्जेराव खटाणे,अर्जुन बहिरवाळ, अभिमान अवचट,सरपंच अंबादास गुजर, प्रा.राजा मचाले, उद्धव क्षीरसागर आदींसह मान्यवर उपस्थित होते.यावेळी बोलताना ह.भ.प.रंधवे बापू म्हणाले की, या परिसरात अण्णांवर प्रेम करणारी मंडळी मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे दरवर्षी या सप्ताहात अण्णांची उपस्थिती गावकर्यांच्या आनंदात भर घालते वारकरी सांप्रदायावर मनातून प्रेम करणारा नेता म्हणजे जयदत्त आण्णा आहेत. जी माणसे विचाराने उंचीचे असतात ती माणसे मनाने देखील मोठी असतात बीड जिल्ह्यात चांगल्या माणसाच्या पाठीशी उभे राहायला हवे. अत्यंत संयमी आणि हुशार नेतृत्व असलेल्या अण्णांनी कधी गर्वाने किंवा द्वेषाने वागलेले नाहीत जगाच्या कल्याणा संतांची विभूती याप्रमाणे सतत दुसर्यांचे हित जाणून ते काम करतात म्हणूनच जो जाणतो तो सर्वांचा प्रिय असतो संतांनी देखील आपले पूर्ण आयुष्य दुसर्यांसाठी समर्पित करून सकारात्मक आणि भक्ती मार्गावर चालण्याची शिकवण दिली आहे जगाला सद विचार देण्याचे काम संतांनी केले. संत सद विचार देतात तर नेते सुविधा देतात म्हणूनच अनेक गावात जयदत्त अण्णांचा मोठा संपर्क राहिलेला आहे. वीस वर्षापासून जयदत्त अण्णा या संस्थांना दरवर्षी भेट देतात अण्णांची उपस्थिती म्हणजे मंझेरी येथील सप्ताहाचे वैभव असते असे ते म्हणाले. यावेळी बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, गेल्या ३२ वर्षाची अखंड परंपरा या गावात सुरू आहे आजचा सप्ताह तितकाच उत्साहात आणि आनंदात पार पडत आहे.सप्ताहामध्ये वाणी आणि विनेचा सूर आनंद देणारा असतो अनेक वर्षापासून या संस्थांचे नाते जुळले गेले आहे अतूट विश्वास आणि जुळलेला धागा यामुळे प्रत्येकाला जोडून ठेवण्याचे काम अविरत चालू आहे लोकांना जोडून ठेवणे आणि त्यांच्या सुखदुःखात सहभागी होऊन सेवा करत राहणे यातच खरा आनंद मी मानतो सत्ता येते आणि जाते मात्र जोडलेले संबंध हे कायम राहतात हा माझा अनुभव आहे.अध्यात्माच्या समतेतून सामाजिक समता निर्माण करण्याचे काम संतांनी केले आहे. समाजाला जागृत करण्याचे काम करत अध्यात्म आणि विज्ञानाची सांगड घालून नवीन संशोधन आता निर्माण होऊ लागले आहे अनेक अद्भुत गोष्टींचा शोध लागला आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या जोरावर जग पुढे जाऊ लागले आहे अशा परिस्थितीतही वारकरी संप्रदायाची ही परंपरा अखंडित आणि अविरतपणे चालू असल्यामुळेच गावागावात समता निर्माण होऊ लागली आहे. जातीभेदाच्या भिंती नष्ट करत माणसे जोडण्याचे काम सप्ताहाच्या माध्यमातून होत असते या परिसरात अनेक विकासाची कामे केल्यामुळे हा परिसर माझ्या राजकीय वाटचालीत मला भक्कम साथ देत आहे त्यामुळे या भागात आपले विशेष लक्ष असते असे सांगून त्यांनी गावातील हनुमान मंदिराच्या सभागृहासाठी १० लाख रुपये मंजूर झाल्याची सांगितले.

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे,

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra).
Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com,
epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com